# मी विठ्ठल पाहिला?

## वारी अनुभव

### लेख क्र. ७: जेजुरी ते वाल्हे - अजून एक पुढची परीक्षा

- राजश्री कुलकर्णी (साऊथ ब्रुन्सविक, न्यू जर्सी)

**वारी:** निरनिराळ्या संतांच्या पालख्या शेवटी पंढरपूरला एकादशीच्या दिवशी जाऊन पोहोचतात. सगळ्या वारकऱ्यांचा निरनिराळ्या पालख्यांमधून केलेला एकत्र प्रवास म्हणजे वारी!

**पालखी:** जवळजवळ प्रत्येक संताच्या नावाची एक पालखी आहे. माहीतगार लोक सांगतात की, माहितीतल्या साधारणतः ८० पालख्या आहेत. सगळ्या ज्ञात आणि अज्ञात मिळून शेकडो पालख्या आहेत. मी ज्ञानेश्वर पालखीतून चालत गेले. ही एक मोठी पालखी आहे. अशीच तुकाराम पालखी, (जिचा मार्ग संपूर्ण वेगळा आहे) तसेच मुक्ताबाई पालखी, (जी सर्वात लवकर सुरू होते आणि जिचा मार्ग सगळ्यात मोठा आहे) आणि अशा या निरनिराळ्या संतांच्या पालख्या, वेगवेगळ्या ठिकाणांहून निघतात, आणि शेवटी पंढरपूरला एकत्र येतात.

**पालखीसोबत चालण्याची पद्धत/रचना:** आम्ही चाललो, त्या ज्ञानेश्वर पालखीत सर्वप्रथम, नगारा वाजवीत देखणी–डौलदार बैलगाडी पुढे निघते. त्यानंतर २ घोडे, त्यातला पहिला माऊलीचा घोडा असतो. त्यानंतर 'रथापुढे' दिंडी क्रमांक २७, त्यामागे 'रथापुढे' दिंडी क्र.२६, दिंडी क्र. २५, २४, २३... त्यामागे दिंडी क्र. १, मग ज्ञानेश्वरांच्या पादुका असलेली उत्कृष्टरित्या सजवलेली पालखी, त्यामागोमाग 'रथामागे' दिंडी क्र. १, 'रथामागे' दिंडी क्र. २, 'रथामागे' दिंडी क्र. ३... अशा रथामागे साधारण २०० दिंड्या आहेत. म्हणजे रथापुढच्या सत्तावीस दिंड्या आणि रथामागच्या दोनशे दिंड्या आणि प्रत्येक दिंडीत २०० ते १००० लोक असतात. आता तुम्हीच गणित करा. आणि ही झाली फक्त ज्ञानेश्वर पालखी! अशा सगळ्या संतांच्या पालख्या असतात. शिवाय कित्येक वारकरी कोणत्याही पालखीशिवाय एकएकटे निघतात. त्यामुळे शेवटी आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरला वारकऱ्यांचा आकडा काही लाखांमध्ये असतो.

**जेजुरी ते वाल्हे - १५.४ किलोमीटर्स**



आजचा प्रवासाचा चौथा दिवस. आज वाल्हेला जायचं होतं. खरं तर आतापर्यंत फक्त तीन गावांनाच मुक्काम झाला. पण दर दिवशी माझी निरनिराळ्या पद्धतीने परीक्षा झाली. आळंदी ते पुणे प्रवासात तळपायाला आलेला ब्लिस्टर/फोड, पुणे ते सासवड प्रवासात घामोळ्यांची सुरुवात (उन्हाचा त्रास), सासवडमधे चिलटांची सतत सोबत(!) आणि आता सासवड ते जेजुरी येथील वाढलेला घामोळ्यांचा त्रास! आता संपूर्ण हात घामोळ्यांनी भरले आहेत.

"माऊली आता यापेक्षा जास्त त्रास होऊ देऊ नकोस", मनातल्या मनात प्रार्थना केली. "बघूया माऊलीच्या कसोटीला उतरते की नाही ते..." खरोखरी विचार केला तर आतापर्यंत बाकी सगळ्या गोष्टी तरी ठीक आहेत. या किरकोळ शारीरिक तक्रारी वगळता, विशेष त्रास नाही; म्हणजे राहणे, खाणे, पिणे, झोपणे, शौचालयांची सोय, इ. ठीक आहे.

सकाळी पाच वाजता ठरल्याप्रमाणे 'अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्ट'मधे सगळे तयार होते. आज वाल्हेला जायचं होतं. मी सामानाची एक छोटी पिशवी घेतली. सहसा प्रत्येक ठिकाणी प्रत्येक गावात मुक्कामाच्या ठिकाणी आमचं सगळं सामान बाहेर काढून मिळायचं. वाल्हे गाव छोटं असल्यामुळे सगळं सामान ट्रकच्या बाहेर, पुरेशी जागा नसल्याने काढत नाहीत, असं सांगण्यात आलं.

'वाल्हे'गावात वाल्या (वाल्मिकी) वाटमारी करायचा. इथे येताना रस्त्याने 'खड्यांचे डोंगर' लागतात. वाल्याला जेव्हा त्याच्या पापांची जाणीव झाली, तेव्हा नारदांनी एकेक पाप मोजून एकेक खडा टाकायला सांगितला, आणि असे ते खड्यांचे डोंगर तयार झाले, अशी आख्यायिका आहे.

प्रत्येक गावाचं एक वैशिष्ट्य होतं. कुठे रांगोळ्या, फुलांची उधळण, भंडारा! वाल्हे गावात 'पालखी' गावातील लोक खांद्यावर घेऊन जातात, तो त्यांचा मान असतो, म्हणे!

आजचा दिवस खूपच गरम होता, (one of the hottest days!) आजदेखील नेहमीसारखी डोक्याला पांढरी ओढणी गुंडाळली होती. त्यावर दुसरी कॉटनची ओढणी, पाण्याने ओली करून चौफेर गुंडाळून अंगावर घेतली. तरीसुध्दा प्रचंड उकाडा जाणवत होता. भाजल्यासारखं वाटत होतं. एका बाजूला टेकड्या आणि दुसऱ्या बाजूला शेतं होती. पण सगळं शुष्क, ओसाड, वैराण आणि रखरखीत!

आज अंतर कमी असल्यामुळे दुपारी साडेबारा वाजताच वाल्हेला पोहोचलो. हरिपाठ म्हणताना गरमीचा त्रास जास्त जाणवला नाही. कारण लक्ष हरिपाठ वाचण्यात आणि गाण्यात होतं. दर ९–१० कडव्यांनंतर हरिपाठ म्हणताना लयबध्द नाचताना खूपच मस्त वाटत होतं. पण इथे फक्त पुरुषच नाच करतात. स्त्रिया करत नाहीत, (याला अपवाद मी!) हळूहळू पुढच्या काही दिवसांत माझ्यासोबत आमच्या दिंडीमधल्या इतर बायकांनीही हरिपाठ म्हणताना नाचायला सुरुवात केली.)

आज मात्र हरिपाठ म्हणताना डावा पाय घोट्याजवळ मुरगळला. झालं काय की, चालतानाचा रस्ता खूप छोटा होता, वेडावाकडा होता. बाजूनी चालणाऱ्या लोकांना चुकवत, दिंडीतली स्वतःची जागा राखून वाटचाल करताना, त्या उंचसखल रस्त्याकडे दुर्लक्ष झालं. हरिपाठ 'पाठ' नसल्यामुळे, सगळं लक्ष हरिपाठ वाचण्यात, हातातल्या पुस्तकाकडे होतं. रस्ता एका बाजूला खूप खाली होता. पाय खूपच वेडावाकडा मुरगळला. क्षणभर खूपच दुखलं, पण हरिपाठ म्हणताना जास्त त्रास जाणवला नाही. 'वाल्हे'ला पोहोचेपर्यंत मात्र पाय चांगलाच सुजला होता.

म्हणजे अजून माझ्या परीक्षा संपल्या नव्हत्या तर! **(क्रमशः)**